# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.01.2026** **वारःशुक्रवार**

---

1. पुढील वर्षाच्या पंधरा ऑगस्टला भारताला पहिली बुलेट ट्रेन मिळणार-रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती
2. पंतप्रधानांच्या हस्ते उद्या दिल्लीत पिप्रहवा बुद्ध अवशेषांच्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचं उद्घाटन.
3. 'विकसित भारत जी-राम जी' योजनेत शेती आणि रोजगार हमी यांचा योग्य समतोल साधल्याचं कृषी मंत्र्याचं प्रतिपादन आणि
4. नववर्षाच्या पूर्वसंध्येला स्वित्झर्लंडमध्ये बारला लागलेल्या आगीत 40 जणांचा मृत्यू

**<u>वैष्णव</u>**

पुढील वर्षाच्या पंधरा ऑगस्टला भारताला पहिली बुलेट ट्रेन मिळणार असल्याची माहिती काल रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव यांनी दिली. ते काल नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. अहमदाबाद-मुंबई दरम्यान बुलेट ट्रेन प्रकल्पाचं काम सध्या सुरू आहे. याचा पहिला टप्पा सुरत ते बिलिमोरा दरम्यान सुरू होणार असल्याचंही ते म्हणाले. तसेच देशाची पहिली शयनयान कक्ष असलेली वंदे भारत रेल्वे गुवाहाटी आणि कोलकाता दरम्यान लवकरच सुरू होणार असल्याची माहिती वैष्णव यांनी दिली. येत्या काही दिवसांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या रेल्वेचे उद्घाटन होणार आहे. शयनयान कक्ष असलेल्या या रेल्वेची अंतिम वेग चाचणी पूर्ण झाल्याची माहितीही त्यांनी दिली.

**<u>पिप्रहवा अवशेष</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्लीतील राय पिथोरा सांस्कृतिक संकुलात भगवान गौतम बुद्धांशी संबंधित पिप्रहवा अवशेषांच्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचं उद्घाटन करणार आहेत. एक शतकाहून अधिक काळानंतर परत आणलेल्या, पिप्रहवा अवशेषांसह राष्ट्रीय संग्रहालय, नवी दिल्ली आणि भारतीय संग्रहालय, कोलकाता यांच्या संग्रहात जतन केलेले पिप्रहवा अवशेष आणि इतर पुरातत्वीय साहित्य या प्रदर्शनात पहिल्यांदाच बघता येईल. 1898 मध्ये पिप्रहवा इथे सापडलेले अवशेष, प्राचीन बौद्ध धर्माच्या पुरातत्व अभ्यासात महत्वाचे आहेत. भगवान बुद्धांनी त्यांचं सुरुवातीचं जीवन पिप्रहवा इथं व्यतीत केलं होतं अशी मान्यता आहे. हे प्रदर्शन बौद्ध धर्माच्या शिकवणींशी असलेलं भारताचं अतूट नातं दर्शवतं. आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी सरकारचे प्रयत्नही यामधून स्पष्ट होतात.

**<u>शिवराजसिंग चौहान-अहिल्यानगर</u>**

'विकसित भारत जी-राम जी' योजनेत शेती आणि रोजगार हमी यांचा योग्य समतोल साधला असल्याचं प्रतिपादन, केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं आहे. अहिल्या नगर जिल्ह्यात राहाता तालुक्यातल्या लोणी बुद्रुक इथं 'विकसित भारत जी-राम जी' अभियानांतर्गत आयोजित विशेष ग्रामसभेत ते काल बोलत होते. गावाच्या विकासाचे निर्णय आता दिल्ली किंवा मुंबईतून घेण्याऐवजी थेट ग्रामसभेच्या माध्यमातून गावकऱ्यांनीच घ्यायचे आहेत, असं चौहान यांनी सांगितलं. जुन्या रोजगार हमी योजनेतील त्रुटी दूर करून, नव्या 'विकसित भारत जी-राम जी' योजनेअंतर्गत आता प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला 100 दिवसांऐवजी 125 दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यात आलं आहे; काम केल्यानंतर 15 दिवसांच्या आत मजुरीची रक्कम थेट बँक खात्यात जमा होईल. यामध्ये प्रशासकीय कारणास्तव विलंब झाल्यास मजुराला 5 शतांश टक्के दरानं व्याजासह रक्कम देण्याची कायदेशीर तरतूद या योजनेत करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. या कार्यक्रमाला जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**डीआरडीओ-स्थापना**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था म्हणजेच डीआरडीओचा 68 वा स्थापना दिवस काल साजरा करण्यात आला. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सशस्त्र दलांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज करून भारताच्या स्वदेशी क्षमतांना बळकटी दिल्याबद्दल डीआरडीओचे कौतुक केले आहे. येत्या काळात हवाई संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी 'सुदर्शन चक्र'च्या निर्मितीमध्ये डीआरडीओ महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**साहित्य संमेलन-सातारा**

99 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं औपचारिक उद्घाटन आज सातारा इथं सकाळी 11 वाजता ज्येष्ठ लेखिका, विचारवंत मृदुला गर्ग यांच्या हस्ते होणार आहे. या संमेलनाचे नियोजित अध्यक्ष विश्वास पाटील, मावळत्या संमेलनाध्यक्ष डॉक्टर तारा भवाळकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले, खासदार उदयनराजे भोसले यांच्यासह इतर मान्यवर उद्घाटन सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. तत्पूर्वी ध्वजारोहण आणि ग्रंथदिंडीनं काल साहित्य संमेलनाला सुरुवात झाली. त्यानंतर झालेल्या ग्रंथदिंडीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पुढचे दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात विविध साहित्यविषयक कार्यक्रम, परिसंवाद, आणि सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

**निवडणूक**

महाराष्ट्रातील महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आज दुपारी 3 वाजता संपणार आहे. उद्या निवडणूक चिन्हाचं वाटप झाल्यानतर अंतिम उमेदवार यादी जाहीर होईल. येत्या 15 जानेवारीलामतदान तर 16 जानेवारीला मतमोजणी होणारआहे.

**उपराष्ट्रपती-चेन्नई**

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आजपासून तामिळनाडूच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. चेन्नईतील डॉक्टर एमजीआर शैक्षणिक आणि संशोधन संस्था विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात ते विद्यार्थ्यांना संबोधित करणार आहेत. चेन्नईमधील रामनाथ गोएंका साहित्य सन्मान समारंभालाही ते उपस्थित राहतील. उद्या ते वेल्लोरमधील एका कार्यक्रमाला हजेरी लावणार असून चेन्नईमधील 9 व्या सिद्ध दिनाच्या समारंभालाही उपस्थित राहणार आहेत.

**फास्टटॅग**

येत्या एक फेब्रुवारीपासून नवीन फास्टटॅग जारी करताना नो युअर व्हेईकल म्हणजेच केवायवी कार्डाची सुविधा बंद करण्याची घोषणा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं केली आहे. महामार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांची सोयीसुविधा वाढवणे आणि फास्ट टॅग कार्यान्वित झाल्यानंतर येणाऱ्या अडचणी कमी करण्याच्या दृष्टीने हे पाऊल उचलले आहे. ज्या वाहनांबद्दल तक्रारी आहेत त्यासाठीच हे कार्ड आवश्यक आहे. तक्रार नसल्यास सध्या वापरात असलेल्या फास्टटॅगसाठी केवायवी कार्डाची आवश्यकता भासणार नाही, असेही मंत्रालयाने स्पष्ट केलं आहे.

**कौशल्य विकास**

कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाने आयोजित केलेल्या कौशल्य मंथन कार्यक्रमाची काल कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी यांच्या उपस्थितीत झालेल्या एका उच्च स्तरीय सत्राने सांगता झाली. देशाच्या राष्ट्रीय उद्दीष्टांशी सुसंगत अश्या प्राधान्यक्रमाच्या सुधारणा ओळखून, प्रतिसाद देणारा, परिणाम केंद्रित आणि भविष्याचा वेध घेणारा कौशल्य आराख़डा तयार करण्यावर यात भर देण्यात आला, त्याच बरोबर कौशल्य संकल्प 2026 ने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

**नड्डा**

केंद्र सरकारला दोन लाख कोटी रुपयांच्या खत अनुदानाच्या प्रक्रिया करण्यासाठीच्या ई-बिल प्रणालीचे उद्घाटन काल केंद्रीय रसानय आणि खत मंत्री जे पी नड्डा यांच्या हस्ते करण्यात आले. पारदर्शक, कार्यक्षम आणि तंत्रज्ञानाधारित प्रशासन

बळक करण्याच्या प्रक्रियेत ही प्रणाली महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. एकात्मिक ई-बिल प्रणाली आर्थिक प्रशासनात लक्षणीय सुधारणा करण्यास मदत होईल.

**<u>स्वित्झर्लंड</u>**

स्वित्झर्लंडमध्ये, नववर्षाच्या पूर्वसंध्येला वालिस कॅन्टनमधील एका रिसॉर्टमधील ले कॉन्स्टेलेशन मद्यालयामध्ये झालेल्या स्फोट आणि आगीच्या घटनेमध्ये चाळीस लोकांचा मृत्यू झाला आणि 115 जण जखमी झाले. स्थानिक पोलिसांकडून घटनेच्या कारणांचा शोध घेतला जात असून, दहशतवादी हल्ल्याची शक्यता पोलिसांनी फेटाळून लावली आहे. स्वित्झर्लंडचे राष्ट्राध्यक्ष गाय पारमेलिन यांनी पीडित आणि त्यांच्या कुटुंबियांप्रती शोक व्यक्त करत आपले नववर्षाचे भाषण पुढे ढकलले आहे.

**<u>इराण अस्वस्थ</u>**

इराणमध्ये काल रात्री आंदोलक आणि सुरक्षा दलांदरम्यान झालेल्या संघर्षात अनेक लोकांनी आपले प्राण गमावले. वाढती महागाई आणि आर्थिक अडचणींमुळे गेल्या तीन वर्षांपासून इराणमध्ये अशांतता आहे. चलन संकट आणि वाढती महागाई याविरोधात दुकानदारांनी रस्त्यावर उतरून निदर्शने केली. पश्चिमेकडील लोरदेगान आणि इस्फाहान प्रांतांसह कालच्या आंदोलनात लोकांचा बळी गेल्याची पुष्टी इराणमधील माध्यमे आणि मानवाधिकार गटांनी केली आहे.

**<u>क्रीडा मंडळ</u>**

भारताच्या राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायद्यातील तरतुदी लागू झाल्यामुळे राष्ट्रीय क्रीडा मंडळ आणि न्यायाधिकरण स्थापन करणाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे सरकारला देशाच्या क्रीडा प्रशासनाची पुनर्रचना करणे शक्य होणार आहे. तसेच ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिक समित्या तसेच राष्ट्रीय क्रीडा महासंघासह क्रीडा संस्थांच्या प्रशासनात आमुलाग्र बदल घडवून आणू शकतो. या तरतुदींमुळे, संस्थांच्या कार्यकारी समित्यांमध्ये 15 सदस्यांची मर्यादा असेल, शिवाय किमान दोन गुणवंत खेळाडूंचा त्यात समावेश असणे बंधनकारक असेल. प्रस्तावित तीन सदस्यीय राष्ट्रीय क्रीडा मंडळाला, संलग्नता देणे आर्थिक व्यवहारांवर देखरेख करणे आणि राष्ट्रीय महासंघांना दंड ठोठावण्याचे अधिकार यामुळे मिळणार आहेत.

**<u>एस.सुरेश-पंतप्रधान</u>**

एस. सुरेश कुमार यांच्या बंगळुरु ते कन्याकुमारी असा यशस्वी सायकल प्रवासाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे कौतुक केले आहे. हा प्रवास धैर्याचा आणि दुर्दम्य इच्छाशक्तीचा असून, अशा प्रयत्नांतून समाजाला तंदुरूस्ती आणि दृढनिश्चयी राहाण्याचा महत्त्व संदेश मिळतो, असे समाज माध्यमांवरील संदेशात त्यांनी नमूद केले आहे. दरम्यान, पंतप्रधानांनी कुमार यांच्या फोनवरून संवाद साधत त्यांच्या धैर्य, चिकाटीचे कौतुक केले.

**<u>छत्तीसगड प्रकल्प</u>**

छत्तीसगडमध्ये काल मुख्यमंत्री विष्णू देव साय आणि केंद्रीय पर्यटन आणि संस्कृती मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांच्या हस्ते काल कबीरधाम जिल्ह्यातील भोरामदेव विकास प्रकल्पाची पायाभरणी करण्यात आली. केंद्र सरकारच्या स्वदेश दर्शन योजनेच्या दुसऱ्या आवृत्तीअंतर्गत होणाऱ्या या विकास प्रकल्पाला 146 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. भोमरादेव मंदीर हे छत्तीसगडचे खजुराहो म्हणून जगभरात प्रसिद्ध आहे. या प्रकल्पामुळे पर्यटकांना आधुनिक सोयीसुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.